नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १२१ Issue - 121 | वार गुरुवार दि. १८ सप्टेंबर २०२५ Blow- Thursday Date 18 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## नवा भारत कोणत्याही अणवस्त्र धमकीला घाबरत नाही

### पंतप्रधान मोदी कडाडले, वाढदिनी पाकिस्तानला ठणकावले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भोपाळ : 'भारताच्या शूर जवानांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे डोळ्यांची पापणी लवते न लवते इतक्यात पाकिस्तानाला गुडघे टेकवावे लागले,' असा ठाम दावा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बुधवारी मध्यप्रदेशातील धार येथील सभेत केला आहे. पंतप्रधानांच्या ७५ वा वाढदिवसादिवसानिमित्त आयोजित या कार्यक्रमात मोदींनी भारतीय सेनेच्या कामगिरीचे कौतुक केल आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'मातृभूमीच्या सुरक्षेपेक्षा मोठं आमच्यासाठी काही नाही. पाकिस्तानी दहशतवाद्यांनी आपल्या बहिणींच्या आणि मुलींच्या कपाळावरील सिंदूर पुसला होता. त्याला प्रत्युत्तर देताना भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले आणि दहशतवादी तळ उद्धवस्त केले. आपल्या शूर जवानांनी डोळ्याच्या पापणी लवते न लवते इतक्यात मला पाकिस्तानला गुडघ्यावर आणले.'



पंतप्रधानांनी पुढे पाकिस्तानवर निशाणा साधताना म्हटलं की, 'कालच जगभराने पाहिलं, एका पाकिस्तानी दहशतवाद्याने स्वतःचे हाल सांगताना रडक्या स्वरात कबुली दिली. हेच आहे नवे भारताचे स्वरूप. अण्वस्त्राच्या धमक्यांना नवा भारत घाबरत नाही. आम्ही घरात शिरून मारण्याची ताकद ठेवतो. आणि हे कालच एका पाकिस्तानी दहशतवाद्यानेही जाणले आहे.

मोदींच्या २२ एप्रिलला जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने प्रत्युत्तरात पाकिस्तानवर निर्णायक कारवाई केली. त्यावर भर देत पंतप्रधानांनी भारतीय लष्कराबाबत कौतुकोद्गार काढले आहेत. तर ७ मे ला बहावलपूर येथे झालेल्या भारतीय हवाई दलाच्या कारवाईत जैश-ए-मोहम्मदच्या मुख्यालयावर मोठा प्रहार करण्यात आला होता. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये जैशच्या कमांडरने स्वतः मान्य केलं की, ऑपरेशन सिंदूरमुळे दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार मसूद अझहरचे कुटुंब उद्धवस्त झाले आहे.

दरम्यान, आपल्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पंतप्रधान मोदींनी धार जिल्ह्यात 'स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाचा शुभारंभ केला. महिलांच्या आरोग्य आणि सक्षमीकरणासाठी हे अभियान महत्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर राज्यातील ८ वा राष्ट्रीय पोषण महिना मोहिमेचीही सुरुवात त्यांनी केली.

याशिवाय, पंतप्रधानांनी 'आदी सेवा पर्व' चे उद्घाटन केले तसेच भेंसोला गावात उभारण्यात येणाऱ्या पीएम मित्र पार्क चा भूमिपूजन सोहळाही पार पाडला. हा पार्क मध्यप्रदेशातील वस्त्रोद्योगाला नवे बळ देईल आणि युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

मोदींनी आपल्या भाषणात स्थानिक विकास प्रकल्पांवर भर देतानाच पुन्हा एकदा दहशतवादाविरोधातील भारताच्या ठाम भूमिकेचा पुनरुच्चार केला. 'देशाची सुरक्षा आणि विकास हा आमचा प्राणवायू आहे. भारत आता कुणाच्याही दबावाला न जुमानता स्वतःच्या ताकदीवर पुढे जाणारा राष्ट्र बनला आहे,' असे ते म्हणाले.

## गेल्या २० दिवसांपासून बेपत्ता सातवीच्या मुलीचा मृतदेह मिळाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम बंगालमधील बिरभूम जिल्ह्यातील रामपूरहाट भागात मंगळवारी २० दिवसांपासून बेपत्ता असलेल्या सातवी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा कुजलेला मृतदेह एका पोत्यात सापडला. मृतदेहाचे तुकडे करून पाण्यात फेकण्यात आले होते. पोलिसांनी बुधवारी विद्यार्थिनीच्या शाळेतील शिक्षक मनोज कुमार पालला अटक केली. विद्यार्थिनीच्या कुटुंबाने आरोपी मनोज कुमार पालवर मुलीचे अपहरण करून हत्या केल्याचा आरोप केला आहे. वृत्तसंस्था पीटीआयने एका पोलिस अधिकाऱ्याचा हवाला देत म्हटले आहे की शिक्षक अनेक दिवसांपासून मुलीवर लैंगिक अत्याचार करत होता.

**निष्पाप जीवाचे तुकडे तुकडे करून पाण्यात फेकले, नराधम शिक्षक अटकेत**

अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, मुलीच्या पालकांनी तक्रार केली की शिक्षकाने तिला अनेक वेळा अयोग्यरित्या स्पर्श केला होता. मुलीने तिच्या आईला याची माहिती दिली होती. ती बेपत्ता झाल्यानंतर, विद्यार्थिनीच्या आईने पोलिसांना या प्रकरणाची तक्रार केली. पीडितेच्या कुटुंबाचे वकील अभिषेक बॅनर्जी म्हणाले की, आम्हाला संशय आहे की मुलीवर तिच्या हत्येपूर्वी अनेक दिवस बलात्कार झाला होता. पोलिसांनी याची चौकशी करावी. दरम्यान, आदिवासी समुदायाच्या सदस्यांनी बुधवारी रामपूरहाट पोलिस ठाण्याबाहेर तासन्तास निदर्शने केली आणि निष्काळजीपणाचा आरोप केला.

शिक्षकाने खून आणि मृतदेह फेकल्याची कबुली दिली

पीटीआयच्या वृत्तानुसार, शिक्षकाच्या भूमिकेवर संशय घेत पोलिसांनी त्याला अटक केली. सखोल चौकशीनंतर त्याने अपहरण, खून आणि नंतर मृतदेह फेकल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. विद्यार्थ्याचा मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आला आहे. कुटुंबातील सूत्रांनी सांगितले की, मुलगी २८ ऑगस्ट रोजी ट्युशन क्लासला जाण्यासाठी घरून निघाली होती. ती परत न आल्यानंतर कुटुंबाने बेपत्ता व्यक्तीची तक्रार दाखल केली. नंतर त्यांनी शिक्षक मनोज कुमार पाल यांनी तिचे अपहरण केल्याचा आरोप केला. मंगळवारी सकाळी पोलिसांनी विद्यार्थ्याचा विद्रूप मृतदेह ताब्यात घेतला. एसपी अमंदिद यांनी फोनवरून सांगितले की, मृतदेहाचे तुकडे करून पाण्यात फेकण्यात आले आहे. तथापि, कुटुंबाकडून अद्याप बलात्काराचा कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. पोलिसांनी सांगितले की, शिक्षकाने विद्यार्थिनीची हत्या का केली आणि हत्येपूर्वी त्याने तिच्यावर अत्याचार केला होता का, याचा तपास सुरू आहे. तथापि, मृतदेह कुजल्याने तपासात अडथळा येत आहे. अटक करण्यात आलेला शिक्षिक नऊ दिवसांपासून पोलिस कोठडीत आहे आणि चौकशी सुरू आहे.

## सीना नदीला पूर; शेती पिकांचं मोठे नुकसान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्याच्या विविध भागात सद्या मुसळधार पाऊस कोसळत आहे. नदी नाले दूथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे अनेक भागात पूरस्थिती झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात देखील मोठा पाऊस झाला आहे.

त्याचबरोबर धाराशिव जिल्ह्यातील सीना कोळेगाव या धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सीना नदीत सोडण्यात आला आहे. यामुळे सीना नदीला पूर आला आहे. यामुळे माढा आणि बार्शी या दोन तालुक्यातील २० ते २५ गावांचा संपर्क तुटला आहे. पुलावरून ४ ते ५ फूट पाणी वाहत आहे.

**माढा आणि बार्शी या दोन तालुक्यातील २० ते २५ गावांचा संपर्क तुटला**

द र म्या न , सीना नदीला पूर आल्यामुळे शेतीचं प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. नदीकाठी ऊसासह केळीचे मोठे नुकसान झालं आहे. उभी पिक पाण्याखाली गेल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. त्याचबरोबर विजेच्या मोटारी देखील पाण्याखाली गेल्या आहेत.

प्रशासनाने तातडीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे तातडीने पंचनामे करावेत अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. त्याचबरोबर धाराशिव जिल्ह्यातील सीना कोळगाव धरणात ज्यावेळी पूरस्थिती निर्माण होते त्यावेळी सीना नदीत पाणी सोडलं जातं. ज्यावेळी उन्हाळ्यात साधारणत: मे महिन्यात सीना नदी काठच्या शेतकऱ्यांना पाण्याची गरज असते त्यावेळी मात्र पाणी सोडलं जात नाही. त्यामुळे उन्हाळ्यात सीना कोळेगाव धरण प्रशासनाने १ टीएमसी पाणी सीना नदीत सोडावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा पावसाळ्यात सीना कोळेगाव धरणाचे पाणी सीना नदीत सोडू नये, त्यांनी पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. सोलापुरात पावसाने केला कहर, सीना नदीची भयावह दृश्य ड्रोन कॅमेरात कैद झाली आहेत. मागील आठवडाभरात झालेल्या मुसळधार पावसामुळे सीना नदीला पूर आला आहे. पुरामुळे दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि मोहोळ तालुक्यातील काही गावांचा संपर्क तुटला आहे.

सीना आणि भीमा नदीवरील जवळपास १५ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे गावात सीना नदीचे रौद्र रूप पाहायला मिळतंय.

## मनोज जरांगे यांची दिल्लीला जाण्याची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळेस मराठ्यांना दगा देतील, असं वाटत नाही. त्यांनी तसं केलं तर त्यांचं राजकीय करिअर खल्लास. समाजापेक्षा मोठा कुणीही नाही. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना असे कोणीही नाही. जातीपेक्षा मोठं कुणी नाही. हे एकदा सोयीला लागलं, मराठवाड्याचं आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी गॅझेटियर लागू झालं की एकदा दिल्लीला जावू, अशी मोठी घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली. पण दिल्लीला आंदोलनासाठी नाही तर आनंदाचा सोहळा म्हणून जाऊ, असं जरांगे यांनी यावेळी स्पष्ट केलं.



पूर्ण भारतातील मराठा एकत्र येणार आहेत. दिल्लीच्या मराठ्यांनी नियोजन केलं आहे. तीन दिवस प्रोग्राम असणार आहे. हरियाणा, पंजाब, गुजरात, बिहार, कर्नाटक सगळ्या राज्यातून आमचे मराठा बांधव एकत्र करण्याचं ठरलं आहे, असा प्लॅन मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी सांगितला.

मला एक सांगा, नुसता इतिहास ऐकून उपयोग आहे का? आपल्याला काय करायचं आहे ते महत्त्वाचं आहे. तिथे मागणी घेऊन जायचं नाही. आपल्या राजाने अटकेपार झेंडा फडकवला. दिल्लीला सुद्धा झेंडा फडकवला. ते प्रत्यक्ष बघायला पाहिजे. त्याशिवाय मजा नाही. आपल्यातल्या बऱ्याच बांधवांनी मुंबई सुद्धा बघितली नव्हती. मस्तपैकी बघितल की नाही?, असा प्रश्न मनोज जरांगे यांनी आपल्या समर्थकांना विचारला.

मला पहिल्यांदा माहीत झालं की त्या बॅरिकेट्सला चाकं असतात. त्यावर एक म्हातारे बाबा बसले. तिथे पोलीस भाऊ आले. ते म्हणाले, बाबा बाजूला सरका. तर बाबा म्हणाले, फक्त एक चक्कर मारतो, अशी मिश्किल आठवण मनोज जरांगे पाटील यांनी सांगितली.

जरांगे पाटील यांनी केले मुख्यमंत्र्यांचे कौतुक

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर सभेत कौतुक केले. कौतुक करताना त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना काका ही उपाधी देखील दिली. फडणवीस काकांनी मराठ्यांसोबत जुळवून घेतलं आहे. त्यांनी आता हैदराबाद गॅझेटचे प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी आमचं भलं केलं. आम्ही त्यांचं कौतुक करू. त्यांच्यासोबत राहू, असं वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी धाराशिव येथे केलं.

आम्ही वर्षा बंगल्यावर आणि त्यांच्यावरही गुलाल उधळणार. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावरही गुलाल उधळणार आहोत. आमच्या आरक्षणाचा प्रश्न सुटला की आम्ही गुलाल उधळणार. त्यांनी आमचा प्रश्न सोडवला मग आम्ही त्यांचं कौतुक करणारच, असंही जरांगे पाटील म्हणाले.

## 'डिजिटल अरेस्ट'च्या धक्क्याने हैदराबादमध्ये महिला डॉक्टरचा मृत्यू

हैदराबाद: सायबर गुन्हेगारांच्या सापळ्यात तीन दिवस अडकलेल्या एका ७६ वर्षीय महिला डॉक्टरचा हृदयविकाराने मृत्यू झाला. बुधवारी हैदराबाद पोलिसांनी ही माहिती दिली. सदर डॉक्टर सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी होते. सायबर गुन्हेगारांनी पोलिस असल्याचे भासवून त्यांचा छळ केला. धमक्या दिल्याचे पोलिसांनी सांगितले. मुख्य वरिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकारी या पदावरून निवृत्त झालेल्या या पीडित महिलेकडून सायबर गुन्हेगारांनी ५ ते ८ सप्टेंबर या काळात ६ लाख ६० हजार रुपये लुबाडले. त्यांच्या मृत्यूनंतरही या गुन्हेगारांकडून मोबाइलवर संपर्क साधणे सुरूच होते. मृत महिलेचे कॉल रेकॉर्ड्स पाहिल्यानंतर सदर बाब उघडकीस आली. मुलाने पोलिसांत तक्रार दाखल केली. या छळामुळेच आईचा आकस्मिक मृत्यू झाल्याचे त्यांच्या मुलाने तक्रारीत म्हटले आहे. या डॉक्टरशी सायबर गुन्हेगारांनी ५ सप्टेंबर रोजी एका मेसेजिंग पद्वारे संपर्क साधला. आरोपींच्या आयडीवर बेंगळुरू पोलिसांचा लोगो होता. फोन करणाऱ्याने एक बनावट तपास अहवाल शेअर केला.

**आरोपीची कबुली, धक्कादायक खुलासा** | **कोणालाही सोडणार नाही : शिंदे**

## मिनाताई ठाकरेंच्या पुतळ्यावर लाल रंग टाकणाऱ्याला अटक


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी स्व. मीनाताई ठाकरे यांच्या दादरच्या शिवाजी पार्क येथील पुतळ्यावर लाल रंग टाकल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. विशेष म्हणजे आरोपी हा ठाकरेंच्या कार्यकर्त्याचा चुलत भाऊ असल्याची माहिती प्राथमिक तपासातून पुढे आलीय. उपेंद्र गुणाजी पावसकर असे आरोपीचे नाव असून गुन्हा केल्याचे त्याने कबूल केल्याची सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, मीनाताई ठाकरेंच्या पुतळ्याजवळ लाल रंग टाकून विटंबना करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर शिवसेनेकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. तर, दोन्ही ठाकरे बंधूंनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली होती.

शिवाजी पार्क येथे उभारलेल्या स्व. मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याजवळ लाल रंग टाकण्याचा प्रयत्न झाल्याने राज्यभरात खळबळ उडाली होती. मुंबईत विविध जिल्ह्यात शिवसैनिकांनी तीव्र शब्दात भावना व्यक्त केल्या. तर, राजकीय नेत्यांनीही आपली प्रतिक्रिया देत आरोपीच्या अटकेची मागणी केली होती. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही पुतळास्थळाची पाहणी करत २४ तासांत आरोपीला बेड्या ठोका असे म्हटले होते. तर, उद्धव ठाकरे यांनीही पाहणी करत पोलिसांना सूचना केल्या होत्या. तसेच, सदर प्रकार दोन प्रकारच्या व्यक्ती करु शकतात. त्यामधील पहिलं म्हणजे स्वत:च्या आई-वडिलांचं नाव घ्यायला शरम-लाज वाटणाऱ्या लावारिस लोकांनी हे कृत्य केलं असेल, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं होतं. तसेच दुसरं म्हणजे बिहारमध्ये ज्याप्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आईचा अपमान झाला, म्हणून बिहार बंद करण्याचा एक असफल प्रयत्न केला गेला. त्याप्रमाणेच हा सर्व प्रकार करुन महाराष्ट्र पेटवण्याचा उद्देश असू शकतो, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले होते.

पोलिसांनी अटक केल्यानंतर आरोपीने जबाबात धक्कादायक माहिती दिली आहे. संपत्तीच्या वादात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे हस्तक्षेप करत असल्याचा आरोप आरोपीने केला आहे. दादर पोलीस ठाण्यात श्रीधर पावसकर आणि आदित्य ठाकरे यांच्याविरोधात तक्रार देण्यासाठी सातत्याने यायचा, अशी सूत्रांची माहिती आहे. आता, आरोपीचा जबाब नोंदवल्यानंतर पोलिस अधिक तपास करीत आहेत.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना संबंधित घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला होता. ही घटना अतिशय निंदनीय आहे, कोणालाही सोडले जाणार नाही. यासंदर्भात मी स्वतः पोलीस आयुक्तांशी बोललो आहे, मुख्यमंत्र्यांनी देखील लक्ष घातले आहे, ही बाब गांभीर्याने घेतल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. कोणत्याही परिस्थिती त्या समाजकंटकाला सोडले जाणार नाही, असे शिंदेंनी स्पष्ट शब्दात सांगितले.



## संपादकीय....

### बळीराजा हतबल

राज्याच्या विविध भागात सद्या मुसळधार पाऊस कोसळत आहे. नदी नाले दूथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे अनेक भागात पूरस्थिती झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात देखील मोठा पाऊस झाला आहे. त्याचबरोबर धाराशिव जिल्ह्यातील सीना कोळेगाव या धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सीना नदीत सोडण्यात आला आहे. यामुळे सीना नदीला पूर आला आहे. यामुळे माढा आणि बार्शी या दोन तालुक्यातील २० ते २५ गावांचा संपर्क तुटला आहे. पुलावरून ४ ते ५ फूट पाणी वाहत आहे. दरम्यान, सीना नदीला पूर आल्यामुळे शेतीचं प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. नदीकाठी ऊसासह केळीचे मोठे नुकसान झालं आहे. उभी पिक पाण्याखाली गेल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. त्याचबरोबर विजेच्या मोटारी देखील पाण्याखाली गेल्या आहेत. प्रशासनाने तातडीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे तातडीने पंचनामे करावेत अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. त्याचबरोबर धाराशिव जिल्ह्यातील सीना कोळगाव धरणात ज्यावेळी पूरस्थिती निमर्ाण होते त्यावेळी सीना नदीत पाणी सोडलं जातं. सोलापुरात पावसाने केला कहर, सीना नदीची भयावह दृश्य ड्रोन कॅमेरात कैद झाली आहेत. मागील आठवडाभरात झालेल्या मुसळधार पावसामुळे सीना नदीला पूर आला आहे.

# ज्यांना पडण्याची भीती असते, ते कधीच उभे राहू शकत नाहीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.**

जीवनात यशस्वी होण्यासाठी धाडस लागते. अपयशाची भीती बाळगून कोणीही मोठं होऊ शकत नाही हे तुच सांगत होतास चुका करा, पण त्यातून शिका आणि पुढे जा आणि तु सांगत नव्हताच तर प्रत्यक्षात कृती करून दाखवलास वैजुनाथ विश्वनाथ गयाळे (सेल टॅक्स इन्स्पेक्टर )पदी निवड झाल्याबद्दल तुझं खुप अभिनंदन अगदी लहान वयात कोणतेही पुस्तक वाचण्याची आवड असलेला सामाजिक क्षेत्रामध्ये ग्राउंड वरुती जाऊन लोकांमध्ये परिवर्तन करण्याची धमक ठेवून लोकांना प्रबोधन करण्याचे काम कौशल्य स्वतःच्या खांद्यावरती घेऊन लोकांना महापुरुषांचे विचार प्रबोधन करणे लहान मुलांचे क्लासेस जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना लाख मोलाचा मार्गदर्शन जिल्हा परिषद शाळेला गावातील प्रत्येक नागरिकांना आव्हान करून नागरिकांकडून पैसे घेऊन स्वतःच्या घरासमान त्याचाही प्रत्येक नागरिकांनी पालन पोषण केले पाहिजे त्या शाळेना कलर देऊन समाजाप्रती गावा प्रती असणारी आत्मीयता अगदी लहान वयात तू गावातील प्रत्येक नागरिकांना दाखवून दिलास तुझ्या विचार संकोचीत नव्हते एका जातीपुरते एका एका वर्गापुरते नव्हते त्यामध्ये प्रत्येक मनुष्य बद्दल विचार मांडत होतास अगदी घरातून विरोध झाला तरी तु कधीच माघार घेतला नाही फक्त संयम ठेवला विचारापर्यंत तू आज पोहोचलास आज सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर पदी निवड झाली आणि गावामध्ये एक दिवाळी साजरी झाली गावचं नाव रोशन करणारी आणि तालुक्याचे नाव महाराष्ट्र मध्ये गाजवणारी गोष्ट तुझ्या हातून घडली त्यांचा खूप अभिमान आहे वैजु यासाठी तु जे काही कष्ट, जिद्द, चिकाटी ,अफाट ,अशी मेहनत घेतलास त्या सर्व गोष्टीचे हे फळ आहे एक सर्वसामान्य शेतकऱ्यांचा मुलगा काय करू शकतो महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांना दाखवून दिलास फक्त हे करण्यासाठी जिद्द चिकाटी आणि




स्वतःजवळ क्षमता आणि संयम असणे हे किती गरजेचं आहे तुझ्या पाच ते सहा वर्षाच्या संघर्षामध्ये दिसून येते अनेक गोष्टीचा तु पाच ते सहा वर्षांमध्ये त्याग केल्यास अभ्यासावरती फोकस केलास आणि आज मान सन्मानाने उंचावणारी घटना घडली आपल्या आई वडील, आपलं गावचं नाव ,रोषण केलास मराठी जिल्हा परिषद शाळेचे ,नाव रोशन केल्यास ही खूप मोठी उंच भरारी आहे वैजू एक शेतकऱ्यांचा मुलगा व फुले शाहू आंबेडकर महात्मा बसवण्णा महापुरुषांच्या विचारांवर चालणाऱ्या एक सर्वसामान्य कुटुंबातील मुलगा विचारांच्या जोरावर लोकांमध्ये प्रबोधन करण्यासाठी निघालेला स्वतःच्या ध्येयप्रती अनेक जॉब सोडून स्वतः इंजिनिअर असून सुद्धा त्या जॉबला लाथ मारून मला माझ्या ध्येयावरती फोकस करायचा आहे असा निश्चय करून एमपीएससी उत्तीर्ण होऊन महाराष्ट्रामध्ये गावचं नाव रोशन करणारा जिल्हा परिषद शाळेचे नाव रोशन करणारा एक शेतकऱ्यांचा आई-वडिलांचा नाव रोशन करणारा फक्त अणि तुच आहेस येणाऱ्या काळामध्ये तुझ्या माध्यमातून गावातील अनेक विद्यार्थी घडतील आणि तू घडवशील हा विश्वास गावातील प्रत्येक ग्रामस्थ लोकांचा आहे कारण अगदी दहावीपासून ते ग्रॅज्युएशन कंप्लेट होजेपर्यंत ज्या पद्धतीने तू सामाजिक धार्मिक, कॉलेजमध्ये अनेक आदिवासी या ठिकाणी जाऊन तेथील परिस्थिती पाहून ग्रामीण भागामध्ये येऊन त्यावरती काम करण्याचे नियोजन केलास जेवढं जमेल तेवढं आर्थिक साह्य करून गडचिरोली अशा भागामध्ये जाऊन अनेक कॅम्पसह दिवाळी सारखा मोठे सण साजरा केलास हे करण्या पाठीमागे फक्त उद्देश इतकाच होता की गरिबातील गरीब मुलांना सुद्धा शिक्षणाचे महत्व कळलं पाहिजे त्यांच्या मूलभूत गरजा वरती ते काम केले पाहिजे हाच उद्दिष्ट ठेवून तू पाच वर्षाच्या पाठीमागे काम करत होतास आणि तोच उद्देश तुझ्यासमोर ठेवून तू एमपीएससी तयारी पूर्ण केलास येणाऱ्या काळात सुद्धा तुझ्या हातून असंच काम होत राहावे तु दाखवुन दिलास *यश हे मेहनतीच्या जोरावर मिळतं,

इच्छा शक्तीच्या नव्हे!

यापुढे सुद्धा सामाजिक सलोखा जपत राहावे M.P.S.C.(सेल्स टॅक्स ऑफिसर )पदी निवड झाल्याबद्दल तुझं खूप खूप अभिनंदन ...... शुभेच्छुक

**– अविनाश सोपान गायकवाड**

# पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा – ऐतिहासिक निर्णय घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची अनेक पशुपालकांबरोबरच राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आग्रही मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी या मागणीला सकारात्मक पाठिंबा दर्शविला आणि पावसाळी अधिवेशनात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी हा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा लोकाभिमुख असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठ्या कृषिप्रधान राज्यांपैकी एक आहे. राज्यातील सुमारे ५५ टक्के लोकसंख्या थेट शेतीवर आणि संबंधित व्यवसायांवर अवलंबून आहे. शेतीसोबतच पशुपालन हे देखील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ७६.४१ लाख पशुपालक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढी-शेळीपालन, वराहपालन व तसेच पशुपालनाशी निगडित मूल्यवर्धित प्रकल्प यांसारख्या व्यवसायांना आता कृषी क्षेत्रातीलच सवलती व लाभ मिळणार आहेत.

पशुपालन हे सामाजिक स्थैर्याचेही आधार

भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून शेतकरी हा तिचा कणा मानला जातो. भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठ्या क्षेत्रांपैकी एक आहे, जे भारताच्या ११.६ टक्के पशुधनासह जगाच्या पशुधनात मोठा वाटा उचलते. ग्रामीण भागातील सुमारे ७० टक्के लोकसंख्या शेती व संलग्न व्यवसायांवर अवलंबून आहे, त्यामुळे पशुपालन, कुक्कुटपालन, मेंढी-शेळी पालन यासारखे व्यवसाय केवळ आर्थिक स्रोत नसून सामाजिक स्थैर्याचेही आधार आहेत.

पशुपालनातून मिळणारे नियमित उत्पन्न हे



शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचे ठरते. ज्या भागांमध्ये पशुपालनाचा प्रसार अधिक आहे, तेथे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ७९ टक्क्यांनी घटल्याचे निदर्शनास आले आहे. याच कारणास्तव केंद्र सरकारने आत्महत्याग्रस्त भागात एकात्मिक शेती प्रणाली, मत्स्य व पशुपालन पॅकेज लागू केले आहे.

केंद्रीय कुक्कुट संशोधन संस्था (आयसीएआर), च्या संशोधनानुसार, १.२५ हेक्टर जमिनीवर एकात्मिक शेती प्रणालीद्वारे सुमारे ५८,३६० रु. उत्पन्न आणि ५७३ दिवस रोजगार मिळतो. यातूनच शेतीसोबत पशुपालन केल्यास आर्थिक व सामाजिक स्थैर्य साधता येते, हे समोर आले आहे.

कृषी क्षेत्राच्या उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा २४ टक्के वाटा

महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमाकांचे कृषिप्रधान राज्य आहे. राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच कृषीसंलग्न क्षेत्रे जसे पशुपालन, मत्स्यपालन तसेच फळफळावळ-भाजीपाला उत्पादनासारख्या पूरक क्षेत्रांशी जोडलेली आहे. कृषी हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, जे राज्याच्या अंदाजे ५० टक्के लोकसंख्येला रोजगार देते. महाराष्ट्रातील कृषीक्षेत्र हे ७-८ टक्के दराने वाढले आहे. महाराष्ट्राचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे ८-९ टक्के इतका आहे. महाराष्ट्र राज्याचा भारतातील सकल राष्ट्रीय उत्पन्नातील (ऋख्र) वाटा अंदाजे १३ टक्के आहे.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले आहेत. यामध्ये कृषी व संलग्न या घटकाचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे. राज्याच्या सकल उत्पन्नात (जीडीपी) अवघ्या सहा जिल्ह्यांचा ५६ टक्के वाटा असून उर्वरित ३० जिल्ह्यांचा वाटा केवळ ४४ टक्के आहे. ही असमतोल स्थिती दूर करण्यासाठी पशुपालन हा आर्थिक समावेशनाचा महत्त्वाचा मार्ग ठरतो.

दुग्ध व्यवसाय, मेंढी-शेळी पालन आणि कुक्कुटपालन या व्यवसायांतून केवळ शेतकरीच नव्हे, तर संबंधित औषध, खाद्य, सेवा पुरवठादार कुटुंबांनाही उपजीविका मिळते. राज्यात १९५ लाख गोवंशीय व म्हशी आहेत, तर सुमारे १ कोटी शेळ्या व २६ लाख मेंढ्या आहेत. हे पशुधन शेकडो कुटुंबांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कुक्कुटपालनातही राज्य अग्रेसर असून ७.४ कोटी पक्षी नोंदणीकृत आहेत.

पशुपालन - केवळ पूरक नव्हे, तर स्वतंत्र आधार

गेल्या काही दशकांत कृषी उत्पन्नात होणाऱ्या चढ-उतारांमुळे अनेक शेतकऱ्यांनी पशुपालनाचा आधार घेतला. गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कुक्कुटपालन, डुक्कर पालन यासारख्या व्यवसायांनी शेतकऱ्यांच्या घरातील रोजचा खर्च भागवण्यास हातभार लावला आहे. दुग्ध व्यवसायातून निर्माण होणारे उत्पादन, अंडी, मांस, लोकर, शेणखत या सर्व गोष्टींना बाजारात वाढती मागणी आहे.

निती आयोगाच्या अहवालानुसार पशुसंवर्धनाचा जीडीपीतील वाटा ४ टक्के असून तो वाढवण्यासाठी नियोजनबद्ध गुंतवणूक व धोरण राबवणे आवश्यक आहे. २०३० पर्यंत भारतात दूध, अंडी, मांस यांची मागणी अन्नधान्यापेक्षा अधिक असणार आहे. त्यामुळे पशुपालनाला धोरणात्मक महत्त्व देणे अपरिहार्य होते.

सद्यःस्थितीत दूध, अंडी व मांस यांचे उत्पादन व उपलब्धता विचारात घेता सन २०३० पर्यंत दूध, अंडी व मांस यांची एकूण मागणी १७ कोटी टन इतकी असून सदर मागणी तृणधान्याच्या मागणीपेक्षा अधिक आहे. पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पध्दतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असल्याकडेही निती आयोगाने लक्ष वेधले असून त्यावर उपाययोजना करुन शेतकऱ्यांची / पशुपालकांची आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली आहे. पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. पशुपालक व्यवसायास प्रोत्साहन देताना कृषी व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देणे हा महत्वाचा पर्याय होता. त्यामुळेच पशुसंवर्धनाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची भूमिका पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली.

पशुधनाची आकडेवारी

महाराष्ट्रात सुमारे १ कोटी ९० लाख जनावरे असून त्यातील ८० टक्के ग्रामीण भागात आहेत. राज्याचे वार्षिक दुग्ध उत्पादन १ कोटी टनांहून अधिक असून त्यातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. पशुपालनातून सध्या २ कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पद्धतीने रोजगारात गुंतलेली आहे.

पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यास होणारे फायदे :

कृषी समकक्ष दर्जा : पशुपालन व्यवसाय आता कृषी क्षेत्राशी समकक्ष मानला जाईल.



वीज दरात सवलत : या निर्णयांमध्ये २५ हजार मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५० हजार अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमतेच्या तसेच ४५ हजार क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसायासाठी, १०० दुधाळ जनावरांचे संगोपन, ५०० मेंढी किंवा शेळीपालन आणि २०० वराह या पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी 'कृषी इतर' या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली.

सौर ऊर्जा प्रकल्पासाठी अनुदान : कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

कर्जावरील व्याज दरात सवलत : कृषीप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

ग्रामपंचायत करात एकसमानता : पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्यासाठी, कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते, त्याच दराने कर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली.

अंमलबजावणीसाठी निधी : योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येणार.

या निर्णयामुळे पशुपालक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात प्रत्यक्ष वाढ होईलच, पण औषध उत्पादक कंपन्या, खाद्य उत्पादक कंपन्या, दूध संकलक आणि प्रक्रिया उद्योग, विक्रेते, वाहतूकदार यांसारख्या अप्रत्यक्षपणे संबंधित व्यवसायांनाही चालना मिळणार आहे. तसेच यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊन अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होईल.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासासाठी पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. हे केवळ आर्थिक स्थैर्यासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील गरीबी कमी करण्यासाठी आणि पर्यावरणीय शाश्वतता साधण्यासाठीही आवश्यक ठरणार आहे.

शेती ही केवळ जमीन जोपासण्यापुरती मर्यादित न राहता, ती समग्र ग्रामीण जीवनशैलीचा भाग आहे. पशुपालन हा त्यातील एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक निर्णय नसून सामाजिक न्याय आणि समावेशक विकासाचा मार्ग आहे.

हा दर्जा दिल्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यवधी पशुपालकांना मुख्य प्रवाहात आणता येईल आणि त्यातून महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादन, रोजगार निर्मिती, आणि ग्रामीण विकासाला नवे बळ मिळेल, यात शंका नाही.

पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा देणं हा ऐतिहासिक निर्णय असून यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान होईल, शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७६ लाख कुटुंबे पशुपालन व्यवसायात असून त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. या निर्णयामुळे राज्यात पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती होईल.

**– पंकजा मुंडे, मंत्री, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य**

**नंदकुमार बलभीम वाघमारे**
**वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**

# वरवडा गावठाण मधील जागा लोक नेते आण्णासाहेब पाटील मराठा भवनासाठी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील वरवडा गावठाण मधील जागा मराठा लोक नेते आण्णासाहेब पाटील भवनासाठी देण्यात यावे यासाठी मराठा समाजाच्या नागरिकातून औसाचे तहसीलदार याचे कडे निवेनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.



१९९३ साली लातूर धाराशिव जिल्ह्यात महाप्रल्यांकरी भूकंप झाला होता त्यात आनेक गावे भुई सपाट झाली आनेकाचे जीव गेले .या परिस्थितीचा आढावा घेऊन प्रशासनाने तात्काळ कारवाई करून आनेक् गावाचे पुनर्वसन करून स्थलांतरित केले औसा तालुक्यातील वरवडा हे एक गाव त्यात येते याचे ही पुनर्वसन करून स्थलांतरित करण्यात आले. पण आज जुन्या गावठाण मधील जागा अंदाजे १०० बाय १०० एवढी जागा प्रशासनाने मराठा भवणसाठी देण्यात यावी जेणेकरून या ठिकाणी विचार विनिमय, तसेच इतर कार्यक्रम करणे बैठका घेनेसाठी मराठा समाजाच्या उपयोगाला येईल म्हणून आज दिनांक १६ सप्टेंबर रोजी औसाचे तहीलदार याचे कडे प्रवीण बाब्रुवन करंडे यांनी मागणी केली आहे.

यावेळी निवेदनावर ग्राम पंचायत सदस्य मोतीराम शाहू कांबळे ,उपसरपंच रामेश्वर जगन्नाथ गवळी, रामभाऊ बाळासाहेब माडजे आदी च्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत, उपजिल्हाधकारी पुनर्वसन विभाग लातूर यांना ही महितिस्त्व असे ही निवेदनात नमूद केले आहे.

# नाशिकचे मनमाड प्रेरणाभुमीसाठी लक्षवेधी धरणे आंदोलनाला इंदू मिल संघर्ष समितीचा जाहीर पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मनमाड/विजय घनघाव : मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या पुढाकाराने लोकवर्गणीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी आश्रम उभारण्यात आले आहे. या वास्तूचे भूमिपूजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते ९ डिसेंबर १९४५ रोजी संपन्न झाले. तर १७ नोव्हेंबर १९५१ रोजी या वास्तूचे लोकार्पण देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते प्रचंड जमसमुदायाच्या उपस्थितीत झाले होते. या वास्तूला 'प्रेरणाभूमी' तर १७ नोव्हेंबर हा दिवस 'प्रेरणादिन' म्हणून सरकारने जाहीर करावा, या मागणीसाठी प्रेरणाभूमी विकास




कृती समितीच्या पुढाकाराने मनमाड येथे १५ सप्टेंबर २०२५ रोजी लक्षवेधी धरणे आंदोलन पुकारले. प्रा.डॉ.अक्षय दिलीपराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मनमाड येथे आंदोलन – कामगार नेते रमेश मारुती जाधव, प्रतीक कांबळे, विलास रुपवते, अशोक कांबळे आदी मुख्य समन्वयक इंदुमिन संघर्ष समिती. .

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्यातील शेतमाल निर्यात वाढीसाठी निर्यात सुविधा केंद्र सक्षम करा : पणन मंत्री जयकुमार रावल

## पुणे येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ संचालक मंडळाची बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे (जिमाका वृत्तसेवा) : राज्यातील फळे, भाजीपाला व इतर शेतमाल निर्यात वृध्दी करून शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे, शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. भाजीपाला व फळे निर्यात करण्यासाठी जगात ज्या बाजारपेठेत मागणी त्याचा अभ्यास करून तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे. भौगोलिक मानांकनानुसार राज्यातील फळांचे ब्रँडिंग करावे.निर्यात मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात यावे. राज्यातील निर्यात सुविधा केंद्र सक्षम करून ही सुविधा केंद्रे पूर्ण क्षमतेने २४७ सुरु ठेवावेत, असे निर्देश राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

पुणे येथील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार चरणसिंग ठाकूर, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रविणकुमार नहाटा, दोडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, मलकापूरचे संजय काजळे-पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे, विपणन व तपासणी संचालनालयाचे विपणन अधिकारी व्ही. एस. यादव, कृषी पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मुख्य व्यवस्थापक विनायक कोकरे, नाबार्डचे उप महाप्रबंधक हेमंत कुंभारे आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर देण्यासाठी जागतिक बाजार व्यवस्थेचा अभ्यास करावा.राज्यात उत्पादित होणाऱ्या फळे व भाजीपाला उत्पादनाला जगाच्या बाजारपेठेत जेथे मागणी असेल तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे.तसेच पणन सुविधा सक्षम करून प्रभावीपणे काम करणाऱ्या राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या पाठीशी सरकार सक्षमपणे उभे आहे. अशा बाजारसमित्यांना अधिक काम करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल.बाजार समितीच्या क्षेत्रीय पीकपद्धती, त्यादृष्टीने उपलब्ध पायाभूत सुविधा, आधुनिकीकरणाची गरज, भविष्यात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधांचा अभ्यास करुन आगामी १० वर्षांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करावा. बाजार समितीने ५, १० आणि १५ एकर जागेत बाजारपेठ निर्मितीकरिता विविध पायाभूत सुविधांचा समावेश करुन आदर्श पायाभूत आराखडा तयार करा.

राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे १०० टक्के संगणकीकरण करण्यात यावे, यादृष्टीने काम करणाऱ्या बाजार समितीला पणन मंडळाच्यावतीने प्रोत्साहन देण्यात येईल, असे निर्देश मंत्री श्री. रावल यांनी दिले.

मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत राज्यात फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र निर्माण करण्यात आले असून शेतकऱ्यांना त्याचा मोठया प्रमाणात लाभ झाला पाहिजे. काजू सोलरबेस ड्राय काजू प्रक्रिया केंद्र प्रकल्प तयार करा. शेतमालाचे अधिकाधिक निर्यातीकरणाच्यादृष्टीने नवीन योजना तयार करावा.

जागतिक दर्जाच्या पणन सुविधांचा विचार करुन ठाणे जिल्ह्यातील बापगाव आणि नागपूर जिल्ह्यातील काळडोंगरी येथील जागा विकसित करण्याकरिता प्रकल्प अह-वाल तयार करावा, एकूणच बाजार समित्यांना बळकट करण्याकरिता नियोजन करावे.

कृषी उत्पन्न बाजार समिती समित्याकडील अंशदान व कर्जवसुली झाल्याशिवाय इतर परवानग्या देवू नये, वसुली नियमित होईल याकरीता मंडळाने आढावा घ्यावा, एकरकमी कर्ज परतफेड धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी. केंद्राच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ कृषी उत्पन्न बाजार समितीला मिळण्याच्यादृष्टीने कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांनी केली.

मुख्यालय तसेच विभागीय अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय भेटी देऊन बाजार समितीच्या अडीअडीचणी सोडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. समिती पदाधिकाऱ्यांशी नियमित संवाद साधला पाहिजे. कृषी पणन मंडळ मंडळाने कायद्याच्या चौकटीत राहून प्रकरणनिहाय पारदर्शक निर्णय घ्यावा. पीकाची वैशिष्ट्ये, बाजारभाव, योजनांची माहिती आदींबाबत समाज माध्यमे, प्रसार माध्यमे, दिनदर्शिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करावी, याकरीता एक पथक निर्माण करा. अधिकाधिक शेतमालाच्या निर्यातीकरणाच्यादृष्टीने नवीन योजना तयार करावी. बैठकीत केलेल्या सूचनानुसार कृती आराखडा तयार करुन सर्व संबंधितानी कार्यवाही करावी, अशी सूचना श्री. रावल यांनी दिली.

ऋ प्रत्येक फळाच्या हंगामाच्या वेळी त्याची भौगोलिक वैशिष्ट्ये असलेली माहिती व जाहिरात करावी. राज्यात शेतमालाच्या बाजारभावबद्दल अफवा पसरवल्या जातात व शेतमालाचे भाव पडण्याचा प्रयत्न केला जातो.यावर आळा घालण्यासाठी बाजार समित्यांनी खोट्या अफवांचे प्रसिद्धी माध्यमांतून खंडन करावे,जेणे करून बाजार भावावर परिणाम होणार नाही.

या बैठकीत कर्ज मागणी प्रस्ताव, अंशदान आणि कर्ज वसुली, एक रकमी परतफेड योजना, प्रशिक्षण योजना, देशांतर्गत व्यापार विकास, स्मार्ट प्रकल्प, बाजार समिती बळकटीकरण, काजू फळबाग प्रक्रिया प्रकल्प आदी विषयाबाबत चर्चा करण्यात आली.

---

## जवळे( दु) मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान गावस्तरीय कार्यशाळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान गावस्तरीय कार्यशाळा जवळे( दु) ता. जि.धाराशिव येथे मोठया उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. मनोज जाधव, तर प्रमुख पाहुणे मारुती काळे तंटामुक्ती अध्यक्ष हे होते कार्यक्रमाचे अध्यक्ष आप्पासाहेब गुळवे, खालील विषयावर चर्चा झाली सुशासन युक्त पंचायत, स्वनिधी लोक वर्गणी, मनरेगा गाव पातळीवरील विविध समित्या उपजीविका व सामाजिक न्याय, लोकसहभाग नाविन्यपूर्ण उपक्रम सच व हरित गाव, प्रमुख मार्गदर्शक रामानंद भिकाने सर लातूर, साधना धावेकर, प्रभाग व्यवस्थापक येडशी, सी आर. पी शालन खैरे, ग्रामपंचायत अधिकारी बालाजी मेनकुदळे, उपस्थित ग्राम पंचायत सदस्य अतुल काळे, लखन वाघमारे,भास्कर काटे, धनंजय जाधव, जयश्री काळे, निर्मला जाधव, वर्षा काळे अंगणवाडी कार्यकर्त्या, प्रतिष्ठित नागरिक मधुकर काळे, सूर्यकांत जाधव, तानाजी जाधव, पोलीस पाटील आर बी अडसूळ, सहाय्यक कृषी अधिकारी विशेष परिश्रम शरद काळे, ग्रामरोजगार सहाय्यक हर्षल दाभेकर, संगणक चालक नाना कोकाटे बापू, उत्तम जाधव, सुधाकर रणदिवे, शिपाई युवराज काळे, ग्रामपंचायत शिपाई, शेवटी सूत्रसंचालन श्रीकांत जाधव यांनी केले. व आभार श्री बालाजी मेनकुदळे ग्रामपंचायत अधिकारी यांनी मानले या कार्यक्रमासाठी गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते,

## वरवडा गावठाण मधील जागा लोक नेते आण्णासाहेब पाटील मराठा भवनासाठी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील वरवडा गावठाण मधील जागा मराठा लोक नेते आण्णासाहेब पाटील भवनासाठी देण्यात यावे यासाठी मराठा समाजाच्या नागरिकातून औसाचे तहसीलदार याचे कडे निवेनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

१९९३ साली लातूर धाराशिव जिल्ह्यात महाप्रल्यांकरी भूकंप झाला होता त्यात आनेक गावे भुई सपाट झाली आनेकाचे जीव गेले .या परिस्थितीचा आढावा घेऊन प्रशासनाने तात्काळ कारवाई करून आनेक् गावाचे पुनर्वसन करून स्थलांतरित केले औसा तालुक्यातील वरवडा हे एक गाव त्यात येते याचे ही पुनर्वसन करून स्थलांतरित करण्यात आले. पण आज जुन्या गावठाण मधील जागा अंदाजे १०० बाय १०० एवढी जागा प्रशासनाने मराठा भवणसाठी देण्यात यावी जेणेकरून या ठिकाणी विचार विनिमय, तसेच इतर कार्यक्रम करणे बैठका घेनेसाठी मराठा समाजाच्या उपयोगाला येईल म्हणून आज दिनांक १६ सप्टेंबर रोजी औसाचे तहीलदार याचे कडे प्रवीण बाब्रुवन करंडे यांनी मागणी केली आहे.

यावेळी निवेदनावर ग्रामपंचायत सदस्य मोतीराम शाहू कांबळे ,उपसरपंच रामेश्वर जगन्नाथ गवळी, रामभाऊ बाळासाहेब माडजे आदी च्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत, उपजिल्हाधकारी पुनर्वसन विभाग लातूर यांना ही महितिस्त्व असे ही निवेदनात नमूद केले आहे

---

## टिटवाळा मेरिडियन शाळेतील बहीण भावाकडून जिल्हा स्तरीय कराटे आणि बॉक्सिंग स्पर्धेत नेत्रदीपक यश





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण/विजय घनघाव : टिटवाळा येथील रिजेन्सी सर्वम स्थित रहिवाशी व मेरिडियन शाळेत शिकत असलेले मास्टर अजिंक्य विनोद इंगळे (१०वी) आणि अस्मिता विनोद इंगळे (८वी) यांनी कराटे आणि बॉक्सिंग खेळामध्ये वेगवेगळ्या कॅटेगरी मध्ये पदक मिळवले आहे.

जिल्हास्तरीय घऊव्चउ उढज बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२५ ही स्पर्धा कल्याण येथे दिनांक ०९.०९.२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

बॉक्सिंग स्पर्धेत मास्टर अजिंक्य विनोद इंगळे यांनी वयोगट १४ मध्ये ब्राँझ पदक पटकावले आहे. त्याचबरोबर दिनांक १२.०९.२०२५ रोजी आशिया कप आंतरराष्ट्रीय ओपन कराटे चॅम्पियनशिप २०२५ अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.

ह्या स्पर्धेत वेगवेगळ्या राज्यातून आणि देशातून जवळ पास ५०० च्या वर खेळाडूंनी भाग दर्शविला होता. ह्या स्पर्धेत टिटवाळ्यातील मास्टर अजिंक्य विनोद इंगळे आणि अस्मिता विनोद इंगळे हे दोघी भाऊ बहिण सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरीचे दर्शन घडविले.

अजिंक्य विनोद इंगळे ह्यांनी काता कौशल्य मध्ये ब्राँझ पदक आणि फाईट कौशल्य मध्ये ही ब्राँझ पदकांची कमाई केली. त्याचबरोबर अजिंक्य ची लहान बहिण अस्मिता ने सुद्धा मोठ्या भावाच्या पावलावर पाऊल टाकत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

अस्मिता विनोद इंगळे हिने काता कौशल्य मध्ये सुवर्ण पदक, तर फाईट कौशल्य कौशल्यामध्ये ब्राँझ पदक पटकावून एक नेत्रदीपक यश पटकावले आहे. बहिण भावाच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे परिसरातील नागरिकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. मेरिडियन शाळेतील मुख्याध्यक आणि शिक्षकांनी या इंगळे बहीण भावाचे कौतुक केले आहे.

## जि. प.प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील जि. प. प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच ड.श्री.प्रणित शामराव डिकले यांच्या हस्ते तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.शाळेत पार पडलेल्या मुख्य कार्यक्रमात लोकसहभागातून व श्री प्रणित डिकले आणि ग्रामपंचायत यांच्या सहकार्यातून शाळेला नवीन प्रिंटर व पंखे भेट देण्यात आले.तसेच शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते सर्व काही ग्रामस्थ, ग्रामपंचायत, पालक व गावातील लोक सहभागातून करण्यात येईल असे आश्वासन दिले. शाळेच्या भौतिक आणि गुणवत्ता वाढीसाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद सहभाग घेऊन तन मन धनाने काम करणार असल्याचे यावेळी मुख्याध्यापक यांनी सांगितले. तसेच विद्यार्थी हिताच्या अनेक योजनांची माहिती पालकांना दिली.

मराठवाडा मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या अनेक वीरांबद्दल शाळेतील विद्यार्थी कु.स्वप्नाली डिकले, अंकिता अंबुरे,आरती वीर,पंकजा सावंत, संघरत्न राऊत, राजवीर काळे, आरवी काळे, आदित्य नाईकनवरे, प्रज्वल बाकले,शिवम डिकले, वेदांत सावंत, आकांक्षा काळे यांनी समायोचित भाषणे केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री माधव पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच ड.प्रणित डिकले यांनी काम पाहिले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक श्री संतोष मोहिते यांनी केले.सुत्रसंचालन उपक्रमशील शिक्षिका श्रीमती आशा पवार यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमती रसिका आगरकर यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक श्री सयाजी शिंदे सर, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी श्रीमती बनसोडे सुजाता , शालेय पोषण आहार कर्मचारी श्रीमती रुक्मिणी डिकले, मयुरी डिकले यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास ग्राम महसूल अधिकारी, यांच्या सह उपसरपंच महावीर डिकले,सुनील काळे, समिती सदस्य श्री जुबेर पठाण, सुहास धाबेकर, गोवर्धन डिकले, माजी केंद्र प्रमुख बोराडे सर,राम माने, नवनाथ काळे,अनंत पोपळे, अंगणवाडी सेविका खोसे ताई, काळे ताई, मदतनीस लिमकर यांच्या सह बहुसंख्येने मातापालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

---

**माढा तालुक्यातील तांबे वस्ती येथे पूर परिस्थितीने पाण्यात अडकलेल्या शेतकरी कुटुंबाला जिल्हाधिकारी यांनी स्वतः थांबून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले**

# जिल्हाधिकाऱ्यांनी मोहोळ, माढा व करमाळा तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची केली पाहणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : जिल्ह्यात १० सप्टेंबर रोजी उत्तर सोलापूर दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यात अतिवृष्टी झालेली होती तर १४ व १५ सप्टेंबर रोजी मोहोळ, माढा व करमाळा तालुक्यात अतिवृष्टी होऊन शेती पिकांचे घरांचे व अन्य बाबींचे नुकसान झालेले आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज मोहोळ, माढा व करमाळा तालुक्यातील गावांना भेटी देऊन नुकसानीची पाहणी केली. तसेच तालुका प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे त्वरित करून अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

जिल्हाधिकारी आशीर्वाद हे आज दुपारी मोहोळ तालुक्यातील आष्टी येथे अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी पोहोचले. तसेच कोळेगाव आष्टी बंधाऱ्यातून सीमा नदी मध्ये पाणी सोडल्याने नदीकाठच्या गावामध्ये पूर परिस्थिती निर्माण झालेली आहे. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतीचे पंचनामे लवकर करण्यात येतील. तसेच लवकरात लवकर शासकीय मदत आपल्याला मिळेल या दृष्टीने प्रयत्न केले जातील असे सांगितले.

माढा तालुक्यातील कुर्डूवाडी, रोपळे, म्हैसगाव व रांजणी या चार मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी कुर्डूवाडी जवळील अतिवृष्टीने ऊस पिकाचे झालेल्या नुकसानीची पाहणी केली तसेच केळी बागेच्या नुकसानीची ही पाहणी करून केळी उत्पादक शेतकरी बालाजी शिरसकर यांच्याशी संवाद साधून त्यांना धीर दिला. त्याप्रमाणेच सीना कोळेगाव प्रकल्पातून पाणी सोडल्याने तांबे वस्ती पाण्यात जाऊन तेथील कुटुंब पाण्यात अडकले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद स्वतः पाण्यात थांबून संबंधित कुटुंबाला बचाव पथकामार्फत सुरक्षित स्थळी स्थलांतरित केले. तसेच स्थलांतर केलेल्या कुटुंबाला अन्नधान्य पुरवठा करण्याबाबत ही प्रशासनाला सूचना दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून शेती पिकाचे पंचनामे त्वरित करण्यात येतील असे सांगितले.

यावेळी तहसीलदार सचिन मुळीक यांनी मोहोळ तालुक्यातील मोहोळ, नरखेड व सावळेश्वर या तीन मंडळात अतिवृष्टी झाल्याची माहिती दिली. तर तहसीलदार संजय भोसले यांनी माढा तालुक्यातील चार मंडळात अतिवृष्टी झाल्याचे सांगितले. तसेच शेती पीक नुकसानीचे प्राथमिक माहिती घेतली असून त्वरित पंचनामे करून अहवाल सादर करण्यात येईल असे संबंधित तहसीलदार यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून करमाळा तालुक्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी-

करमाळा तालुक्यात रविवारपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सीना नदीला महापूर आला असून, अनेक गावांमध्ये पूरस्थिती गंभीर बनली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संगोबा येथे सीना नदीच्या बंधाऱ्यावरून वाहणाऱ्या पाण्याची पाहणी केली आणि ग्रामस्थांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी तहसीलदार शिल्पा ठोकडे, पोथरे गावचे सरपंच अंकुश शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते. जिल्हा प्रशासन पूरस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहावे, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे. करमाळा तालुक्याच्या केम, कोर्टी, जिंती, केतुर, चालसे, पोथरे, उमरड, पांगरी व अर्जुन नगर या ९ महसूली मंडळात अतिवृष्टी झालेली आहे.

# संविधानामुळे सामान्य माणूसही सशक्त होऊ शकतो

## सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ; बार्टीच्यावतीने मुक्तिसंग्राम मराठवाड्याचा, जागर संविधानाचा कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

संविधानामध्ये एवढी मोठी ताकद आहे की, त्यामुळे सामान्यातला सामान्य माणूसही सशक्त होऊ शकतो, असे प्रतिपादन सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी केले.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांच्या वतीने तापडिया नाट्यगृह येथे मुक्ती संग्राम मराठवाड्याचा, जागर संविधानाचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन शिरसाठ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे,जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,बार्टीचे महासंचालक सुनील वारे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अनंत राऊत,स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र जोगदंड, अप्पर जिल्हाधिकारी महेंद्र हरपाळकर यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना ना. शिरसाट म्हणाले,मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा इतिहास तरुण पिढीने समजून घेतला पाहिजे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी संविधानाची व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्यागाची प्रेरणा घेऊन जीवनामध्ये सशक्त बनले पाहिजे.

माझ्यासारखा सामान्य माणूस संविधानाच्या ताकदिने मंत्री पदापर्यंत पोहोचू शकला,अशी किमया संविधानात आहे. असेही ते म्हणाले. याप्रसंगी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला. जे विद्यार्थी संविधानाचे सर्व कलमे पाठ करतील त्यांना एक लाख रुपयाचे बक्षीस बार्टीमार्फत दिले जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनीही आपले विचार मांडले. व्याख्याते डॉ. अनंत राऊत यांनी देशांमध्ये संविधान संस्कृती रुजविण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.बार्टी सातत्याने संविधानाचा जागर करते ही भूषणवह बाब असल्याचे ते म्हणाले. रवींद्र जोगदंड यांनीही राष्ट्रीय विकासात संविधानाचे महत्त्व विशद करून मराठा मुक्तिसंग्रामाचा इतिहास मांडला. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी केले.

संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी केले. यावेळी काही विद्यार्थ्यांना राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता या पंधरवड्या निमित्त जात पडताळणी प्रमाणपत्राचे वितरणही मंत्री महोदय यांच्या हस्ते करण्यात आले. याच कार्यक्रमात प्रसिद्ध लोकशाहीर कुणाल वराळे यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची सुरुवात राज्य गीत व हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पित करून झाली संविधान, या कार्यक्रमाला अप्पर जिल्हाधिकारी डॉ. भारत कदम, माजी महापौर नंदकुमार घोडे , विकास जैन,समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त रवींद्र शिंदे, जात पडताळणीच्या उपायुक्त जयश्री सोनकवडे बार्टीच्या व्यवस्थापक नसरीन तांबोळी, प्रकल्प अधिकारी सोनवणे

यांच्यासह विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, बार्टीचे समतादूत अधिकारी,कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# गटतट बाजूला ठेवून गावाच्या सर्वांगाने विकासासाठी एकत्र येणे गरजेचे : आमदार अभिजीत पाटील

### आमदार अभिजीत आबा पाटील यांच्याकडून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' उद्घाटन करून ग्रामसभेस उपस्थित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त व मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या औचित्य साधून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान तुंगत, पांढरेवाडी, देवडे या म्हाडा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांच्या अडीअडचणी समजून



घेऊन कामाचा पंधरवडा याबाबत सुचना केल्या..

अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबपर्यंत प्रत्येक गावांमध्ये अनेक योजना राबवून गावाचा सर्वांगीण विकास करून केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोचवाव्यात अशी भूमिका मांडली. लोकसहभागातून ग्रामविकासाला नवी दिशा मिळते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान उपक्रमास आजपासून सुरुवात होत असून ग्रामपंचायतींचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी नक्कीच फायदा होईल असे आमदार अभिजीत पाटील म्हणाले. यावेळी पंढरपूर तहसीलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, नॅशनल हायवेचे केशव घोडके यांच्यासह सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शासकीय अधिकारी, ग्रामसेवक , पंचायत समिती कर्मचारी, पत्रकार बांधव, पदाधिकारी, जेष्ठ मान्यवर, तरूण सहकारी, माताभगिंनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयानी २९ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन साजरा करावा

सोलापूर (जिमाका): राज्य शासनाच्या निर्देशानुसार प्रतिवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. यंदा रविवार, २८ सप्टेंबर २०२५ रोजी शासकीय सुट्टी असल्यामुळे २९ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी साजरा करावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी कळविले आहे.

या दिनाचे औचित्य साधून शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्था व अशासकीय समाजसेवा संस्थांच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये:

– प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध व वक्तृत्व स्पर्धा – चर्चासत्रे व व्याख्यानमाला – भित्तीपत्रक स्पर्धा व जनजागृती उपक्रम

या उपक्रमांसाठी लायन्स क्लब, रोटरी क्लब यांसारख्या संस्थांच्या सहकार्याने पारितोषिकांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

माहिती अधिकार दिनानिमित्त माहितीचा अधिकार कायदा–२००५ मधील तरतुदींची उजळणी, अधिकारी–कर्मचाऱ्यांचे प्रबोधन, प्राप्त अर्जांची कार्यवाही व अपिलांची सुनावणी पूर्ण करणे, तसेच कार्यालयात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची माहिती दर्शनी भागात प्रसिद्ध करणे अपेक्षित आहे. यावर्षीचे सर्व उपक्रमांचे इतिवृत्त दि. ०३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी सुचित केले आहे.

# स्पर्धा परीक्षेसाठी कठोर परिश्रम घ्या यश निश्चित मिळेल : मल्लिनाथ कल्याणशेट्टी



### कल्याणशेट्टी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट :

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा कठीण वाटते,परंतु त्यांनी कठोर परिश्रम करून जिद्द व चिकाटीने परीक्षा दिली तर यश हमखास मिळते याचा अनुभव बहुसंख्य परीक्षार्थींना आला आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षण तज्ञ मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालया तील पंचप्पा कल्याणशेट्टी कौशल्य विकास केंद्रांतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पुनम कोकळगी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

#### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या वतीने ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी देखील आपल्या भाषणातून शुभेच्छा दिल्या.

पुढे ते म्हणाले की, स्पर्धा परीक्षांसाठी संदर्भ ग्रंथाचे वाचन केले पाहिजे, संस्कृती, कला, क्रीडा व चालू घडामोडी आदीसाठी दैनंदिन वर्तमानपत्रे वाचावी लागतात, त्यातील संदर्भ अधोरेखित करावे लागतात, त्यामुळे ज्ञानाचे संवर्धन होते, लेखनशैली प्रभावी होते, त्यामुळे यशाचा मार्ग खुला होतो. पुनम कोकळगी म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी चौफेर अभ्यास केला पाहिजे संदर्भ ग्रंथांचे वाचन, मनन व चिंतन करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केला पाहिजे त्यामुळे यश आणखीनच जवळ येते.

प्रारंभी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ दीप प्रज्वलनाने करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले तर आभार प्रा सौरभ भस्मे यांनी मानले.

# जुन्या तहसिलदार कार्यालयातील नगर भूमापन कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करण्यास नगर भूमापन कार्यालयाचा नकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : जुन्या तहसिलदार कार्यालयात सुरु असलेले सिटी सर्वे तथा नगर भूमापन कार्यालय नवीन प्रशासकीय कार्यालयात स्थलांतरित करा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांनी, तालुका उप अधिक्षक भूमी अभिलेख एस.आर. गौड मॅडम तालुका पुरंदर यांना लेखी निवेदन देऊन केली होती, याबाबतचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी पुणे जिल्हा भूमी अभिलेख अधिक्षक पुणे यांना व पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांना देण्यात आले होते.





प्रशासकीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, नागरीकांना एकाचं ठिकाणी सर्व शासकीय कार्यालयातील कामे करणे सोयीचे व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने सासवड येथे भव्य प्रशासकीय इमारत बांधली आहे, या इमारतीत उपविभागीय अधिकारी तथा प्रांत,पुरंदर,यांचे कार्यालय तहसिलदार कार्यालय , तालुका कृषी अधिकारी कार्यालय, व दुय्यम निबंधक तथा सब रजिस्ट्रार तालुका पुरंदर यांचे कार्यालय ,व नगर भूमापन कार्यालय यासाठी भव्य प्रशासकीय इमारत बांधण्यात आली आहे, नवीन प्रशासकीय इमारतीत इतर सर्व कार्यालय सुरु झाली आहेत मात्र पुरंदर तालुका नगर भूमापन कार्यालय आजही अत्यंत जीर्ण अवस्थेत असलेल्या जुन्या तहसिलदार कार्यालयात सुरु आहे, त्यामुळे एकाच इमारतीत नागरीकांची कामे करता यावीत या शासनाच्या धोरणाला वाटाण्याच्या अक्षता लावण्याचे काम भूमी अभिलेख विभागाकडून केले जात आहे की काय ? असा प्रश्न नागरीकांना पडला आहे, नगर भूमापन कार्यालय अद्याप नवीन प्रशासकीय इमारतीत सुरु करण्यात आले नाही ते तात्काळ सुरु करण्यात यावी अशी मागणी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या वतीने विष्णूदादा भोसले यांनी केली होती यावेळी तात्काळ सार्वजनिक विभागाला पत्रव्यवहार करुन सिटी सर्व्हेचे कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करु असे आश्वासन तालुका भूमी अभिलेख उप अधिक्षक एस आर गौड मॅडम यांनी विष्णूदादा भोसले यांना दिले होते. परंतु भूमी अभिलेख कार्यालय पुरंदर यांनी कार्यालय स्थलांतरित करण्याबाबत अद्याप कोणतीही हालचाल केली नसल्याने पुरंदर तालुका भूमी अभिलेख कार्यालयाच्या उप अधिक्षक एस आर गौड मॅडम यांच्याशी याबाबत संपर्क साधला असता, नवीन प्रशासकीय इमारतीत नगर भूमापन कार्यालयासाठी अपूरी जागा असल्याने, जुन्या तहसिलदार कार्यालयात असलेल्या इमारतीतील कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करण्याबाबत अपु –या जागेमुळे नकार दिला आहे.याबाबत गौड मॅडम यांच्याशी संपर्क साधला असता ,नवीन प्रशासकीय इमारतीत जागा वाढवून देण्याबाबत तहसिलदार यांच्याकडे लेखी मागणी करणार आहे , असे तालुका उप अधिक्षक एस आर गौड मॅडम यांनी सांगितले.

त्यामुळे नगर भूमापन कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित होईल का ? नाही हा प्रश्न नागरीकांना पडला आहे, याबाबत पुरंदरचे लोकप्रतिनिधी माजीमंत्री आमदार विजय शिवतारे, यावर काय तोडगा काढतात ते पाहावे लागेल.

### गाणी, कविता, नाटक, अभिवाचन सादर करत केले प्रबोधन

# रेनी कार्निवल संवाद तरूणाईचा कार्यक्रमातून तरुणांची भरली संसद संवाद

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा पाच्छापूर रोडवरील दोंदे फार्म हाऊस येथे समता संघर्ष संघटन व समता संघर्ष सांस्कृतिक मंच यांच्या वतीने रेनी कार्निवल – संवाद तरुणाईचा हा सांस्कृतिक कार्यक्रम रविवारी (दि. १४ सप्टेंबर २०२५) मोठ्या उत्साहात पार पडला. शिव, बिरसा, फुले, शाहू आणि आंबेडकरी विचारांना गती देत तरुणाईच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम तिसऱ्या वर्षीही यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेखक उत्तम जोगदंड, तर उद्घाटक म्हणून लेखिका शिल्पा कांबळे उपस्थित होत्या. अन्याय, जातीवाद, अंधश्रद्धा, गुलामगिरी व हुंडाबळी विरोधातील पोस्टरांची जाळून प्रतीकात्मक होळी करण्यात आली, असून आगळ्या वेगळ्या पद्धतीने सामाजिक संदेश देत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

प्रत्येक कलेच्या पाठीमागे विचार असतो आणि त्यातूनच प्रबोधन घडते असे प्रतिपादन शिल्पा कांबळे यांनी केले.

देश घडवणारे तरुण जर कलावंत ठरले तर समाजात मोठा बदल घडवून आणू शकतात. मतभेद गाडून समाजासाठी उभे राहणे हेच आजच्या तरुणांचे ध्येय असले पाहिजे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष लेखक उत्तम जोगदंड यांनी व्यक्त केले.

समता संघर्ष संघटनेचे अध्यक्ष शैलेश दोंदे म्हणाले, विद्यार्थी आणि तरुणांना एकत्र करून सांस्कृतिक चळवळ गतिमान करता येईल. आम्ही तळागाळातील कार्यकर्त्यांना शोधून सोबत जोडण्याचे कार्य करत आहोत. प्रत्येक सहभागीने आपले नाव लिहून कागदी पान 'समतेच्या वृक्षा'वर चिकटवून प्रतीकात्मक वृक्ष फुलविला. पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांनी गाणी, कविता, अभिवाचन सादर केले. बदलापूर येथील महिला टीमने कथन अंधाराला भेदणारं हे नाटक सादर करून दाद मिळवली.

दुसऱ्या सत्रात धर्मनिरपेक्ष समाजवाद निर्मूलन संविधान संशोधक विधेयक २०२५ या विषयावर संसद संवाद भरवण्यात आला. यात ड. प्रकाश जगताप यांनी सभापतीची भूमिका निभावली. अखेरीस उठाव मंचचे कवी संमेलन झाले. ज्येष्ठ साहित्यिक विवेक मोरे अध्यक्षस्थानी होते. एका ओळीत व्यक्त व्हा या उपक्रमातून प्रेक्षकांची मते लेखी स्वरूपात घेतली गेली.

कार्यक्रमाच्या विविध विभागांना वैशिष्ट्यपूर्ण नावे देण्यात आली होती त्यात उलगुलान असे प्रवेशद्वाराला नाव देण्यात आले भोजनालयला कांबळे भोजनालय, कवितेच्या मंचास काव्यफुले कवी, अश्वघोष नगरी, नोंदणी कक्षास जनता नोंदणी कक्ष, मुख्य सभागृहाला सत्यशोधक सभागृह अशी विविध प्रतिकात्मक नावे देण्यात आली होती. सदर कार्यक्रमाला समता संघर्ष संघटनचे अध्यक्ष शैलेश दोंदे, उपाध्यक्ष सदानंद गायकवाड, संघटक गणेश सोष्टे, अंबरनाथ नगरपालिकेचे उपअभियंता सुनिल जाधव, ड. ए. आर कांबळे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे, पत्रकार संतोष चव्हाण, पत्रकार अशोक पाटोळे, सामाजिक कार्यकर्ते गौतम जाधव, प्रमोद जाधव, ज्येष्ठ साहित्यिक शुक्राचार्य ,



ज्येष्ठ कवी बबन सरवदे,गायकवाड, ड. श्रीकांत कांबळे, अविनाश दोंदे, रविंद्र गायकवाड आणि समता संघर्ष संघटनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक मिलिंद जाधव, सुरेखा पैठणे, रोहित जाधव, अक्षय भोईर, सुरज भालेराव, विशाल सोष्टे, किशोर सावंत, दुहिता जाधव, स्वप्निल भोईर, सोनाली जाधव, कपिल जाधव, विशाल जाधव, वैभवी अडसुळे, संघरत्न घनघाव, सागर भोईर, ज्योती टोबरे यांनी अथक परिश्रम घेतले.